# महानिर्मिती

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, लेबर कॅम्प, धारावी रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२४०७७४४१/२४०९०३५१ ईमेल :- dyeohr2@mahagenco.in


---

**महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.११(Sep)/२०१७**

**निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांची सरळसेवा भरती**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतील निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या **http://www.mahagenco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

१) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्युत केंद्रातील तसेच सांघिक कार्यालय, मुंबई येथील निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरावयाची आहेत.

**निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| पदाचे नाव | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निम्नस्तर लिपीक (मासं) | ०० | ०६ | ०१ | ०० | ०३ | ०१ | ०० | ०७ | १८ |
| निम्नस्तर लिपीक (मासं) (महानिर्मिती कंपनीतील वेतनगट-३ व ४ मधील पदांवर सेवेची ०१ वर्ष पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांकरीता) | ०६ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०९ |
| निम्नस्तर लिपीक (लेखा) | ११ | ०८ | ०६ | ०१ | ०२ | ०१ | ११ | ४० | ८० |

| पदाचे नाव व वेतनगट | अ.ज. | वि.जा.-(अ) | भ.ज.-(क) | वि.मा.प्र. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| निम्नस्तर लिपीक (मासं), वेतनगट-३ | ०६ | ०१ | ०३ | ०१ | ०७ | १८ |
| महिला ३०% | ०२ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०५ |
| माजी सैनिक १५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेळाडू ५% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०३ | ०१ | ०२ | ०१ | ०४ | ११ |
| एकूण | ०६ | ०१ | ०३ | ०१ | ०७ | १८ |

| पदाचे नाव व वेतनगट | अ.जा. | अ.ज | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|
| निम्नस्तर लिपीक (मासं) (महानिर्मिती कंपनीतील वेतनगट-३ व ४ मधील पदांवर सेवेची ०१ वर्ष पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांकरीता) वेतनगट-३ | ०६ | ०१ | ०२ | ०९ |
| महिला ३०% | ०२ | ०० | ०१ | ०३ |
| माजी सैनिक १५% | ०१ | ०० | ०० | ०१ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०० | ०० | ०० | ०० |
| खेळाडू ५% | ०० | ०० | ०० | ०० |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०३ | ०१ | ०१ | ०५ |
| एकूण | ०६ | ०१ | ०२ | ०९ |

www.nmk.co.in

| पदाचे नाव व वेतनगट | अ.जा. | अ.ज. | वि.जा.-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | विमाप्र | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निम्नस्तर लिपीक (लेखा), वेतनगट-३ | ११ | ०८ | ०६ | ०१ | ०२ | ०१ | ११ | ४० | ८० |
| महिला ३०% | ०३ | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०० | ०३ | १२ | २३ |
| माजी सैनिक १५% | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ | ०६ | १२ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०४ |
| खेळाडू ५% | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०४ |
| भूकंपग्रस्त २% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| सर्वसाधारण | ०४ | ०५ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १७ | ३६ |
| एकूण | ११ | ०८ | ०६ | ०१ | ०२ | ०१ | ११ | ४० | ८० |

* **अपंग उमेदवारांकरीता ३% प्रमाणे ०३ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या असून सदर ०३ जागा खालील पदनिहाय अपंग उमेदवारांमधून भरण्यात येतील.**

| अ.क्र. | पदाचे नाव | अपंगांसाठी राखीव पदे | अपंगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | निम्नस्तर लिपीक (मासं) | ०१ | OA,OL,BL,OAL,B/LV,HH |
| २ | निम्नस्तर लिपीक (लेखा) | ०२ | OL,BL,LV,HH,MW |

२) उपरोक्त पदांसाठी विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता / अनुभव / वयोमर्यादा इत्यादीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव व वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | निम्नस्तर लिपीक (मासं)<br>Lower Divisional Clerk (HR)<br>वेतनश्रेणी :- ११२७५-२७५-१२६५०-३७०-१६३५०-४१०-२८२४० | 1.Degree in Arts, Science, Commerce or Management / Administration from a University recognized by the UGC<br>2. MS-CIT exam passed. | Nil |
| २ | निम्नस्तर लिपीक (लेखा)<br>Lower Divisional Clerk (Account)<br>वेतनश्रेणी :- ११२७५-२७५-१२६५०-३७०-१६३५०-४१०-२८२४० | 1.B.Com<br>2. MS-CIT exam passed. | Nil |

* **शैक्षणिक अर्हता व अनुभव ही उमेदवारांना जाहिरातीत अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी जाहिरातीच्या अंतिम दिनांकास (दिनांक २२.०९.२०१७) रोजी धारण करणे आवश्यक आहे.**

१) **<u>वयोमर्यादा :</u> दिनांक २२.०९.२०१७ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

१) मागासवर्गीयासाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.

२) अपंग उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

३) माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही सरसकट ४५ वर्षाची राहील.

४) खेळाडू आरक्षणांतर्गत अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकरीता उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.

५) प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रकल्प/१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ दि.०३/०२/२००७ नुसार खुल्या व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात आली आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी व भूकंपग्रस्तांसाठी कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे राहील.

६) महानिर्मिती कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ५७ वर्षे राहील.

**<u>निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाकरीता ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. २२.०९.२०१७अशी आहे.</u>**

www.nmk.co.in

## सर्वसाधारण अटी :-

१) जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत /आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

२) जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करावा. संबंधित पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. सामाजिक आणि समांतर आरक्षण निहाय तात्पुरत्या निवड सूची यादीत निवड होणाऱ्या उमेदवाराची कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच तसेच शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर आवश्यक अटी व शर्ती पुर्ततेच्या अधीन राहूनच उमेदवाराच्या निवडीबाबतची कार्यवाही पार पाडण्यात येईल.

३) उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांकरीता ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर केलेले अर्जच ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही मार्गाने केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४) शासकीय/निमशासकीय/तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत दिलेल्या सुचनेनुसार अर्ज सादर करावा. अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या/संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.

५) महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

## मागासवर्गाचे आरक्षणासंबंधी अटी / नियम:-

१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे.

२) मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता संबंधित जात वैधता समितीस आवश्यक ते दस्तऐवज सादर केल्याची पोहोच सादर केल्यानंतरच तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती देण्यात येईल. जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी निवड झालेल्या उमेदवाराची जबाबदारी राहील.

३) मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.

४) मागासवर्गीय उमेदवारानी ते महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र (Domicile Certificate) स्वत:च्याच नावाने सादर करणे आवश्यक आहे.

www.mmk.co.in

## समांतर आरक्षणासंबंधीचे अटी / नियम:-

१) शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. (महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे. तसेच खुल्या (Open) प्रवर्गात अर्ज सादर करणाऱ्या महिला उमेदवारांकरीता त्यांनी खुल्या (Open) प्रवर्गाचेच उपरोक्त शासन निर्णयानुसार विहीत नमून्यातील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे).

२) अपंग प्रवर्गासाठी एकूण ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यापेक्षा कमी अपंगत्व नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार नवी दिल्ली क्र.३६०३५/३/२००४ ईएसटीटी (आरईएस), दि.२९/१२/२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि.०७/०६/२००६ अनुसार निवडीस / नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. ज्या अपंग उमेदवारांजवळ कायमस्वरुपी अपंग असल्याचे जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले प्रमाणपत्र उपलब्ध असेल, अशाच अपंग उमेदवारांनी अपंग आरक्षणातंर्गत अर्ज सादर करावा.

३) माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नांव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) असणे आवश्यक आहे.

४) शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना ५% आरक्षण राहिल. प्रकल्पग्रस्त म्हणून अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे **महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१.०१.१९८० नुसार विहित नमून्यात प्रकल्पग्रस्तांचे प्राधान्यक्रम दाखला (प्रपत्र) असणे अत्यावश्यक आहे.**

५) शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ दि. २७/०८/२००९ मधील तरतुदीनुसार भूकंपग्रस्त व्यक्तींसाठी **२ टक्के समांतर आरक्षण** राहील. शासन निर्णय क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दि.०४.११.२०१६ मधील तरतुदीनुसार संबंधित भरती प्रक्रियेमध्ये भूकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या पदांवर भूकंपबाधित उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, तर सदर पदांवर प्रकल्पग्रस्त उमेदवारांची निवड करण्यात येईल.

६) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/ प्र.क्र. ६८/ क्रीयुसे-२, दि.०१.०७.२०१६ अनुसार ५% आरक्षण राहील. खेळाडू आरक्षणातंर्गत केवळ राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम,द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेल्या अथवा सुवर्ण ,रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत. त्याचप्रमाणे उमेदवारांनी वेतनगट-३ म्हणजेच गट-क मधिल निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाकरीता खेळाडू आरक्षणांतर्गत अर्ज सादर करताना ते उपरोक्त शासन निर्णयातील सुधारीत तरतुदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीवेळी विभागीय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू उमेदवार वेतनगट-३ म्हणजेच गट-क मधिल निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाकरीता खेळाडू आरक्षणांतर्गत निवडीकरीता पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेला अहवाल सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

७) समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन नियमानुसार पदे भरण्यात येतील.

www.nmk.co.in

**महत्वाच्या सुचना :**

१) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.उमेदवारांनी त्यांचा ई-मेल आय-डी व मोबाईल नंबर भरती-प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवणे, ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी आहे. उमेदवाराचा ईमेल-आयडी व मोबाईल नंबर बंद झाल्यास अथवा बदलला गेल्यास उमेदवारास मेल अथवा संदेश प्राप्त न झाल्यास महानिर्मिती कंपनी जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) या संदर्भातील अधिक माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

३) अ) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे व अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने ती सिध्द करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे ही कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे

स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. ऑनलाइन अर्ज काळजीपूर्वक भरावा. अचूक अर्ज भरण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

ब) उमेदवाराने अर्जात अचुक माहिती भरणे ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. एकदा भरलेली माहिती उदा.जात, धर्म, इत्यादी बाबतीत भविष्यात कोणताही बदलासंबंधित अर्ज स्विकारला जाणार नाही किंवा तसा कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४) **निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाकरीता उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा मराठी व इंग्रजी भाषेमध्ये घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

५) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६) ऑनलाईन अर्ज स्विकृत करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. परंतु एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर कोणत्याही प्रकारचा बदल उमेदवारास करता येणार नाही व शेवटी भरलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी. अर्जाची प्रत स्वत:जवळ तयार ठेवावी व अंतिम निवडीपूर्व अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी मागितली जातील, त्यावेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

७) ऑनलाईन पध्दतीने निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांकरीता अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रत ही उमेदवारांनी निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांची पद भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत: जवळ बाळगणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. ऑनलाईन अर्जाची प्रत हरविल्यास, गहाळ झाल्यास त्यास महानिर्मिती कंपनी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

८) ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास आपली अडचण hrhelpdesk@mahagenco.in या ई-मेल आयडीवर नोंदवावी किंवा ०२२-४२०४०१८८ / ४२०४०२४० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**उमेदवारांना इतर महत्वाच्या सुचना :**

१) निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांसाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व ऑनलाईन परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. **भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही, तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही.** उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय तसेच अन्य कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

३) **उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल.**

४) परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये किंवा परिक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

५) **उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान पूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.**

www.mmk.co.in

६) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. तसेच उमेदवाराजवळ महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे स्वत:च्या नावे असलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जाहिरातीस अनुसरुन कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले उपलब्ध असणे आवश्यक आहे.

७) ऑनलाईन परिक्षेतील गुणानुक्रमे निवडीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना कंपनीने मागणी केल्यानुसार कागदपत्रे तपासणीवेळी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, अनुभव, अधिवास प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रती व निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) या स्व-साक्षांकित करुन अर्जासोबत कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

८) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्या सापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना उपलब्ध रिक्त जागा व आवश्यकतेनुसार महानिर्मिती कंपनीतंर्गत नेमणूका देण्यात येतील.

९) सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१०) निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांकरीता अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे ही कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे. तसेच जाहिरातीत नमुद शैक्षणिक अर्हता व अनुभव ही उमेदवारांना जाहिरातीत अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी जाहिरातीच्या अंतिम दिनांकास (दिनांक २२.०९.२०१७) रोजी धारण करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज स्विकृत (Submit) करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. तद्नंतर एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर उमेदवाराची कोणतीही दुरुस्ती विचारात घेतली जाणार नाही. सदर बाबतीत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

११) उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी नेमकी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील, कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी विहित केलेली कागदपत्रे सादर न केल्यास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही तसेच ऑनलाईन अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी सेवा प्रवेश प्रकियेच्या किंवा परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

<u>अर्ज करण्याची पध्दत :</u>

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व माहिती http://www.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वर दर्शविलेल्या लिंकवर ऑन लाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) उमेदवार परिक्षा शुल्क भरण्यासाठी Net Banking / क्रेडीट कार्ड / डेबिट कार्ड या सुविधा वापरुन खुल्या प्रवर्गातील उमेदवार रु ५००/- इतके तर मागास प्रवर्गातील उमेदवार रु ३००/- इतके परिक्षा शुल्क भरु शकतील. उमेदवारांनी परीक्षा शुल्क उपरोक्त पध्दतीद्वारे भरावयाचे आहे.

३) विहित नमुन्यातील ऑन लाईन अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावर दिनांक ०१.०९.२०१७ पासून उपलब्ध राहील. सदर अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक २२.०९.२०१७ रोजी २३:५९ वाजेपर्यंतच राहील. उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

www.mmk.co.in

४) **अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राह्य धरण्यात येतील व ती सिध्द करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.**

५) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, अनुभव, इत्यादी उमेदवारांना लागू पडत असलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या स्वतः साक्षांकित केलेल्या प्रती सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत मागणी केल्यानंतर देणे क्रमप्राप्त आहे.

६) अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**निवड पध्दती :**

१) जाहिरातीस अनुसरुन पात्र झालेल्या अर्जदार उमेदवाराची चाळणी करण्यासाठी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

२) उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा ही मराठी भाषा,इंग्रजी भाषा,गणित (इयत्ता १० वी च्या पातळीचे),संगणकीय ज्ञान, सामान्य ज्ञान या विषयांवर आधारीत असेल. ऑनलाईन परीक्षा ही एकुण १०० गुणांची असेल व चुकीच्या उत्तरांकरीता गुण कमी करण्याचे (Negative Marking) पध्दत अवलंबिली जाणार नाही.

३) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त जागांनुसार सामाजिक आणि समांतर आरक्षण विचारात तात्पुरत्या निवड सूची यादीकरीता पात्र ठरणाऱ्या उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदरची तात्पुरती निवड सूची कंपनीच्या www.mahagenco.in या संकेत स्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच तसेच शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर आवश्यक अटी व शर्ती पुर्ततेच्या अधीन राहूनच उमेदवाराच्या निवडीबाबतची कार्यवाही पार पाडण्यात येईल.

५) उमेदवारांकडून मागणी केल्यानंतर सादर केलेल्या अर्जाची सविस्तर छाननी निवडसूची बनविते वेळी केली जाईल. ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या माहिती पृष्टयर्थ योग्य ते दस्तऐवज सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

६) तात्पुरती निवड सुची यादी तयार करताना खुल्या(Open) प्रवर्गातील निवडीकरीता ४० गुणांचा व मागास प्रवर्गातील (Backward Class) निवडीकरीता ३० गुणांचा निकष (Cut-off) ठेवण्यात आलेला आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) निवडसुची बनवितांना ज्या उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील ज्येष्ठताक्रम ठरविण्यात येईल.

८) **निवड झालेल्या उमेदवारांनी अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव व ईतर सर्व बाबी इत्यादी सिध्द करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहिल. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल. तसेच सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.**

९) दस्तऐवज सादर करण्याच्या कालावधीमध्ये उमेदवाराने दस्तऐवज सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१०) निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांच्या निवड पध्दतीत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवीत आहे.

www.nmk.co.in

महत्वाच्या तारखा :

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक ०१.०९.२०१७ ते दिनांक २२.०९.२०१७ |
| Net Banking द्वारे फी भरण्याचा कालावधी | दिनांक ०१.०९.२०१७ ते दिनांक २२.०९.२०१७ |
| ऑनलाईन परिक्षेची तारीख | महानिर्मिती कंपनीच्या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल. |
| ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता अडचण येत असल्यास दूरध्वनी क्रमांक | ०२२-४२०४०१८८ / ४२०४०२४० |
| ई-मेल आयडी | hrhelpdesk@mahagenco.in |

**ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याकरीता येथे क्लिक करावे**

www.nmk.co.in